## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी ?

# प्रभुतरुण

(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.org

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



## प्रभु तरुण आश्रयदाते

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



वर्ष ८९ वे) प्रभुतरुण मुंबई, रविवार, ता. १६ माहे सप्टेंबर, सन २०१२ (अंक ९९६


*संपादकीय*

## वाट पाहू या नवतीची

**—सुहासिनी कीर्तिकर**



**कै. सुहास कोठारे, पुण्यस्मरण**

प्रभुतरुणाचा ८९वा वर्धापनदिन सोहळा २६ ऑगस्टला साजरा झाला! दरवर्षीप्रमाणेच ह्या सोहळ्याचे आयोजन-नियोजन पाठारे प्रभू तरुण युवायुवतींनी साजरे गोजरे केले.यावर्षी निवेदन केले सौ. भक्ती प्रधान-शेट्ये हिने. इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतल्याने इंग्रजीच खरंतर तिची सोयीची भाषा. पण तिने मला वेळोवेळी फोन वरून तिचे निवेदन मराठी करून घेतलं अन् अत्यंत नेटकेपणाने मराठीतच सादर केलं. आपल्या तरुणांना आपलंसं करून घेतलं की काय किमया घडते अन् प्रभुतरुणाभोवती तरुणांचं मोहोळ कसं तयार होतं त्याचा अतिगोड प्रत्यय. यावर्षी वर्धापनदिनाचे प्रमुख अतिथी होते माननीय श्री. अजित मोरोबा विजयकर. सुरुवातीलाच त्यांच्या हस्ते कै. सुहास कोठारे आणि कै. विहंग नायक यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून प्रभुतरुणाने या दोन समर्थ संपादकांचं कृतज्ञ स्मरण केलं. युवापिढीचे हे सुहासकाका अन् विहंगकाका. त्यांनीच तर 'युवामंच' संकल्पना राबविली ना! त्यांना अभिवादन करून मग प्रमुख अतिथी मंचावर विराजमान झाले. त्यांच्यासोबत होते श्री. विनोद प्रधान, सत्कारमूर्ती सौ. संगीता आशिष राव, मी स्वतः अन् खास या आमच्या युवकांच्या आग्रहाखातर श्री. बन्सी धुरंधर. (त्यांचे बन्सीकाका!)

प्रमुख अतिथी श्री. अजित विजयकरांचा भेटवस्तू देऊन सत्कार केला श्री. विनोद प्रधानांनी. आमच्या युवकांनी यावेळी पुष्पगुच्छ-सोपस्काराला चाट देऊन हरित पर्यावरणाची बूज राखत भेट म्हणून 'इवलेसे रोप' दिलं. अगदी घरगुती स्वरूपात. त्यावर चांदी-वर्ख वगैरे न गुंडाळता. मला वाटते यातूनच प्रभुतरुणावरील प्रेमाचा 'वेलू गगनावेरि' जाईल! कौटुंबिक वातावरण यातूनच घडते ना! अर्थात श्री. अजित विजयकरांचा असा सत्कार होण्यापूर्वी मी त्यांचा परिचय करून दिला. अतिशय अवघड गोष्ट! कारण पाठारे प्रभू चॅरिटीजने नुकताच त्यांचा सत्कार केला तेव्हा कितीतरीजणं त्यांच्याविषयी भरभरून बोलले होते. मीही संपादकीय त्यांच्यावरच लिहिले होते. मग आता परत ओळख? पण 'पाहिलेचि पहावे पुन्हा पुन्हा' असे वाटतेच. एकनाथ महाराजांनी म्हटले आहे- 'सगुण चरित्रे। परम पवित्रे। आदरे वर्णावी।।' अजित विजयकरांचे चरित्र हे 'सगुण चरित्र' आहे. प्रभुतरुणाशी त्यांचा आत्मीय संबंध आहे, म्हणूनच श्रीमती नलिनी तळपदेंसारख्या समर्थ लेखिकेने प्रभुतरुणात लिहावं यासाठी ते प्रयत्नशील राहिले. खरं तर नलिनीताईंना मी आधी विचारलं होतं. पण तेव्हा ते तसंच राहिलं. पण अजित

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Save Paper Go E-Paper !!!

**-Sanjana Kothare**

How ironical it is when we talk about conserving nature by saving trees on one hand and on the other cutting those very trees to make paper to write 'Save Trees'. Here we are taking pride in having 100% literacy in our community however we are hesitant to move on with the progressive world in our personal lives. We have people talking volumes about conserving nature and calling themselves environmentalists however do they actually 'Go Green' when it comes to preserving nature in their personal capacity? There might be just a handful who actually practice what they preach.

We at Prabhu Tarun have always been evolving with time and accepting the 'changes' in the society. The use of technology in different means of communication is useful for the betterment of the society. However the country will not be called progressive till we all adapt ourselves to the evolution and make it a part of our lives. We have been taking pride in being called the highly educated class however; can we proudly call ourselves progressive in terms of evolving with technology and communication when we still stick to the age-old systems for what-so-ever reasons?

In order to keep up with the times and majorly to cater to the gen-next Prabhu Tarun launched its web-site in 2009 and the first issue to go online was in the month of July 2009. With the current global warming issue and to aid conserving our natural resources we thought of the e-paper concept which would help in saving paper which in turn would save trees. It is not very surprising to find in every house-hold that the news-letter finds its place from the magazine rack to the waste basket at the end of the month or probably at the 'raddiwala' stall along with the rest of the newspapers which were probably not even opened on certain days. Are we not committing a crime and sabotaging mother-nature instead of conserving it and wasting our resources?

Besides having the monthly publications going online every month, we have many more attractions on our web-site which would make it more interesting and informative. However the web-site is still not uploaded with all the sections that have been chalked out by us but the work is surely in progress with our Technical support team comprising of Mrs. Dnyanada Pradhan - Pawar and Mr.Sunil Pawar who take care of maintaining the website and upgrading it for us. They are currently helping us and working on the development of our web-site which will be witnessed soon by all our subscribers.

The present structure is likely to change very soon however let me update you all with what is currently available on the website besides the monthly Prabhu Tarun issue which can be viewed in the PDF format. Currently the website has 4 main pages Home, Publication, Office bearers and Yuva Manch wherein the History of Prabhu Tarun and History of Yuva Manch has also been provided. The office bearers page gives information about the past and present Editor of Prabhu Tarun, the co-editors and the Trustees. The Contact Us page at the bottom of the main screen provides

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

विजयकरांनी आपणहून विचारलं अन् नलिनीदल फुललं हो! अजित विजयकरांचं हे माणूसपण मला समारंभात सांगता आलं वेगळेपणाने. २६ ऑगस्टलाच खरं तर चॅरिटीजचा अधिक मासानिमित्त सोहळा होता. पण प्रभुतरुणावरील प्रेमामुळे श्री. वीरपाल राणे, श्री. अजित इथं आले, अन् प्रभुतरुणाला ‘अधिकस्य अधिकम् फलम्’ लाभले; याचाही मी उल्लेख केला.

अशा या विजयकरांच्या हस्ते ‘अधिकम् फलम्’ असे सत्कार याचवेळी केले गेले. एक होता सौ. संगीता राव यांचा. त्यांची प्रभावी आणि सुंदर ओळख सौ. सुश्मिता नवलकर हिने करून दिली. संगीताताई पार भारावून गेल्या. त्या लग्नानंतर परभू झाल्यात. त्यांच्या जन्मसिद्ध जातीत जेवढा आपलेपणा अन् कौतुक लाभलं नाही; तेवढं आपण परभांनी केलं- हे त्यांनी आवर्जून सांगितलं. दुसरे दोन सत्कार ‘आमच्या घरातले’ होते. श्री. बन्सी सदाशिव धुरंधर अन् सौ. सुरेखा बन्सी धुरंधर यांच्या वयाच्या साठीनिमित्त त्या दोघांना आश्चर्याचा सुखद धक्का देऊन केलेले. हे असे ‘दे धक्का’ तंत्र तसं आरोग्यदायी असतं. रोजचेच आत्मीय संबंध त्यामुळे उजळतात अन् कामाला तेज येतं. ‘प्रेमबेली’ रूजवणं महत्त्वाचंच ना! या दोघांनीही भारावून जाऊन आपल्या भावना शब्दातून ओसंडू दिल्या. सुख असं सार्वजनिक स्वरूपात ऊतू जाण्यालाही भविष्य घडविताना अर्थ असतोच की.

केवळ भावनांचा खेळ मात्र चालत नाही. भविष्य घडविण्यासाठी आपण नेमके कुठं उभे आहोत त्याचाही गंभीरपणे लेखाजोखा मांडणं निदान वाढदिवशी वाढताना आवश्यक असतं. त्यामुळे यावर्षी एक वेगळाच प्रयोग केला गेला. पडद्यावर प्रभुतरुणाची वाटचाल तीन टप्प्यात दाखवली गेली. एक टप्पा ‘प्रत्युष’चा होता. त्याची झलक पडद्यावर दाखवून श्री. मिथील नवलकरने या ‘प्रत्युष’चं स्वरूप, त्यामागचा उद्देश, प्रत्युषआधीची अन् नंतरची ‘पार्टी’- त्याचं प्रयोजन छान पद्धतीनं उलगडून दाखवलं. दुसरा टप्पा होता- प्रभुतरुणाच्या वेबसाईटचा. सौ. संजना कोठारे हिने या वेबसाईटचा उद्देश, त्यासाठी होणारी धडपड, वेबसाईटचे वर्गणीदार होणाऱ्यांबद्दलचा साद-प्रतिसाद अत्यंत चोखपणे आणि प्रत्ययकारी रीतीनं सांगितला. तिसरा टप्पा होता ‘प्रभुतरुण’ मासिक अन् दिवाळी अंकाच्या लिखित स्वरूपावरचा. साहजिकपणे हे काम या युवापिढीनं अस्मादिक संपादिकेकडं सोपविलं. प्रभुतरुणाचा वाङ्मयीन दर्जा, दर महिन्यात कमीत कमी सहा लेख, युवामंचचं स्वतंत्र एक पान, त्यासाठी लोगो, युवकांचा सहभाग, ‘अतिथी संपादक’ या संकल्पनेतून तयार झालेलं नवीन कार्यकारी संपादिकांचं सक्षम वलय,‘विजयकरी’ - ‘हसरी रेखा’ ही सातत्याने येणारी व्यंगचित्रांची मालिका, कथा, कविता, इंग्रजी-मराठीचा लेखनमाध्यम म्हणून वापर, दिवाळी अंकाचं मुखपृष्ठ- त्यामागची प्रयोजनं, युवकांनी प्रामुख्याने जबाबदारी उचललेले विविध विभाग अन् बाळापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वांना सामावून घेणारा दिवाळी अंक, त्यात घरातील सजावट-गणपती यांचं घडवलेलं दर्शन, ज्ञातीतील सर्व संस्थांच्या कार्यांना दिलेली निरपेक्ष प्रसिद्धी, ज्ञातीतील घडामोडी अन् गौरवपर शुभचिंतन, वात्रटिका, वैचारिक लेख आणि ललित लेख यांचा सांभाळलेला तोल, ‘प्रकाशातील परभू’ वगैरे वगैरेविषयी मी समालोचन केलंच. पण यानिमित्तानं दोन उलटसुलट प्रतिक्रिया याव्यात यासाठी श्री. नंदकुमार विजयकर आणि श्रीमती मृदुला प्रभुराम जोशी यांना बोलतं केलं. श्री. नंदकुमार विजयकर यांनी इंग्रजी लेखनाबद्दल नाराजी व्यक्त केली. दिवाळी अंकात विषयवार विभाग पाडल्यामुळे त्या त्या लेखनात एकसुरीपणा येतो असाही अभिप्राय त्यांनी दिला. ते प्रभुतरुणाचे लेखक आणि परिवारातील एक आहेत. त्यांच्या सूचनांचा आदर करून मी प्रभुतरुणाची भूमिका, प्रयोगशीलता अन् त्यामागचा उद्देश स्पष्ट करत त्यांच्या आक्षेपांना सयुक्तिक उत्तर दिलं. तेव्हा त्यांनी परत उभं राहून इंग्रजीचं प्रमाण कमी असावं असं आपलेपणापोटी सांगितलं. नंतर उभ्या राहिल्या मृदुला जोशी. त्या म्हणाल्या, ‘मध्ये कितीतरी वर्षे माझा ज्ञातीयांशी अन् ‘प्रभुतरुणा’शी संपर्कच नव्हता. पण सुहासिनीमुळं तो आला. सुहासिनीनं प्रभुतरुणाचा वाङ्मयीन दर्जा निश्चितच वाढवलाय. त्यामुळं ‘प्रभुतरुणा’ची मी हल्ली वाट पाहते. डॉ. सदाशिव गोरक्षकरांशी वेगळ्या कामाकरिता फोनवर माझा संपर्क झाला, तेव्हा तेही सुहासिनीच्या लेखांबद्दल आवर्जून चांगलं बोलले.’ मृदुलाचं इतर ठिकाणचं लेखन संपादनाचं मोठं कार्य पाहता मृदुलानं दिलेली ही पावती मला आणि प्रभुतरुणाला खरंच मोलाची होती. यावेळी पडद्यावर साकारणाऱ्या प्रभुतरुणाच्या आढाव्याची तांत्रिक तयारी श्री. गुंजारव नायक आणि श्रीनल कोठारे यांनी केली होती. मुंबई हायकोर्टाला १५० वर्षे झाल्याबद्दल चालू असलेल्या प्रदर्शनाबद्दल, श्री. राजन जयकर यांच्या कामगिरीबद्दल सांगून मी प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन यावेळी सर्वांना केलं.

याचवेळी सौ. पूजा अजिंक्यनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. त्यांच्या ‘वलय प्रतिष्ठान’च्या उपक्रमाबद्दल प्रभुतरुणाचे सहकार्य त्यांना फार मोलाचे वाटल्याचे सांगून त्यांनी सुंदर, सुबक पुष्पगुच्छ भेट म्हणून दिला. हा पुष्पगुच्छ डॉ. पवन कीर्तिकर यांनी ‘वलय’तर्फे दिला अन् संपादक या नात्याने मी स्वीकारला. डॉ सुरेखा धुरंधरांनी आपल्या सत्काराला उत्तर देतांना सर्व ज्ञातीयांचा मनोरंजनात्मक एकच भव्य सोहळा व्हावा अन् त्यासाठी सर्व संस्थांनी एकत्रित यावे असा प्रस्ताव मांडला होता. कदाचित् पूजा अजिंक्यच्या ‘वलय’ मधून त्याला आकार येईल!

यानंतर आपले मनोगत व्यक्त केले प्रमुख अतिथींनी. प्रभुतरुणाबद्दल त्यांच्या भाषणाआधीच बरेच बरेच ‘बरे’ बोलले गेले. तरीही आपल्या भाषणात त्यांनी आपला ‘हातचा’ राखलाच होता. अतिशय हृद्य असं ते बोलले. सर्व युवापिढीला प्रेरणा मिळेल असं अन् मला कृतार्थ वाटेल असंही. त्यांच्या भाषणानंतर दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे सौ. वृंदा अन् श्री. शाम जयकर यांनी भेट दिलेला केक श्री. अजित यांच्या हस्ते कापण्यात आला. सौ. वृंदा स्वत: उपस्थित राहू शकल्या नाहीत. तरीही त्यांनी प्रमिला तळपदेंबरोबर ही भेट पाठवली. प्रमिला तळपदेही प्रभुतरुणावरील प्रेमामुळे आवर्जून उपस्थित होत्या. साहजिकच श्री. मधुकर तळपदेंची तीव्रतेने आठवण झाली. ती मी जाहीरपणे बोलूनही दाखवली. या प्रभुतरुणाच्या केकबरोबरच आपल्या युवापिढीनं आणलेला मोठा केकही बन्सी आणि सौ. सुरेखा यांनी जोडीनं कापला. ‘क्या बात, क्या बात’!

या समारंभासाठी दरवर्षी डॉ. विनोद धुरंधरांकडचे खास बुंदीलाडू असतात. यावर्षी तेही उपस्थित राहू शकले नाहीत, तरी लाडू आलेच! ‘देणाऱ्याचे हात हजारो’चा प्रत्यय आम्हाला नेहमीच येतो तो असा! देणग्या तर किती किती आल्या. या देणग्यांचा तपशील शिल्पा जयकरने सर्वांना सांगितला अन् तिनं मनापासून सर्वांचे आभारही मानले.

खरं तर यावेळी पावसाचेही आभार मानायला हवे होते! गेली दोन वर्षे तोही बरसतच होता यादिवशी. तो नव्हता म्हणून तर नंतरच्या जेवणाच्या आस्वादाची गोडी सर्वांना निवांतपणं घेता आली.

आपण सवयीनं बाप्पाला म्हणतो, ‘पुढच्या वर्षी लवकर या!’ त्यामागे खूप खूप प्रेम असतं. इथं मीही वर्धमान होणाऱ्या प्रभुतरुणाच्या नारळीपोर्णिमेला येणाऱ्या वाढदिवसाला मनापासून म्हणते- ‘पुढच्या वर्षी लवकर ये!’ हो! कारण पुढच्या वर्षी प्रभुतरुणाचा नवती (९०) उत्सव असेल ना!

(पान १ कॉलम ४ वरून)

information about the Registration process for the web-site and also the subscription procedure for the hard copy of Prabhu Tarun.

The publication section currently has monthly issues from July 2009 till date. That's about 3 ½ years of our monthly publications are online alongwith the Diwali issues of the past 3 years from the year 2009. In the near future we intend to upload all the issues along with our special Diwali Issues dating right from the first issue dated 25th August 1923 in the 'Archives' section which will help us to preserve our age old newsletter and the valuable writings of our past editors and the knowledgeable writers who have made a major contribution in the form of articles thereby enhancing the literary value of Prabhu Tarun. As far as the publication is concerned, the members who have registered onto the website will be privileged to have an access to all the monthly issues and the Diwali issues published till date. We are also introducing a "BLOG" wherein you may post your comments about the issue or any particular article.

Besides that we also have introduced a Special Section called "Simply Sokaji" which presently has one sub-section named 'Chali Reeti' which contains information on Parbhi Lagna giving details about the procedure of our culture and rituals followed in a Pathare Prabhu wedding right from 'jawaab' to 'satya narayan puja' performed after marriage. Coming up in the near future in this section is Parbhi 'Munja' and 'Baarsa'. Besides this, the information about the various festivals and the rituals that we follow shall also be incorporated in the same section.

Another information provided in the "Chali Reeti" section is the information about Pathare Prabhu 'Rangolya' as many non Pathare Prabhu daughter-in-laws are interested in knowing our typical Rangolis and also useful for our Pathare Prabhu young generation who are unaware that we have typical Rangolis for every day during Diwali.

The most interesting section that we have online is the "Recipes" section. Currently what we have online are some 'Pathare Prabhu Delicacies' being shared by Mrs. Pratima Vinod Pradhan and Mrs. Shweta Kothare-Iyer has shared her multi-cuisine culinary skills under the heading "Masala Box'. We also welcome you all to share your recipes and send them along with your name and a photograph of the dish prepared by you to our mailing address i.e. pp.prabhutarun@gmail.com so that we could include the same in our recipe section and preserve your recipe under your name for the reference of our future generation.

Another section that we intend to start soon is a Picture Gallery. This Gallery will consist of pictures of our Ganpatis and the special and different decoration that a Pathare Prabhu household boasts of. We had requested some families to share their Ganpati pictures and the relevant information about the uniqueness of the Ganpati with us

(पान ३ कॉलम १ वर)

(पान २ कॉलम ४ वरून)

for one of our Diwali issues. However due to some difficulty all the pictures could not be published and we sincerely extend our apologies for the same. As a gesture of apology we hereby request all those who are interested to send us their Ganpati pictures and the relevant information to our mailing address at pp.prabhtarun@gmail.com once again so that we give it a permanent place on our web-site.

Now the much awaited section which is in the pipeline to be uploaded soon is the Information provided to us by the most knowledgeable and respectable Historian of our community Mr. Pratap Motiram Velkar. Mr. Pratap Velkar had been kind enough to provide us with all the information about our past legends, the long forgotten heroes of our community who have made a considerable contribution which is not limited to the community but to the society at large. These names and their remarkable contribution to the world is unknown to our community people. Such information about the past legends was provided to us by Mr. Velkar and the same will be published under a Separate page called "LEGENDS". This page shall have a sub-section dedicated to Mr. Pratap Velkar and his compilation of our past history, Mr. Velkar's book on Pathare Parbhancha itihaas and also a few audio video clippings of Mr. Velkar providing information on some of our past legends.

Another sub-section called "HALL OF FAME" shall feature information about 'Living Legends' as we have many such noted figures in our community who according to us, have currently made a remarkable mark in the society and have their credentials and talent appreciated by the world at large. This section shall have information about these noted personalities of our community whose names shall be revealed very soon and shall be immortal in our 'Hall of Fame'. Watch out for the 'Chosen Ones' who make it to Prabhu Tarun's "Hall Of Fame'

All these attractions are coming very soon onto our web-site www.prabhutarun.org however the sad part is people still crave for the age old hand delivered Prabhu Tarun and refuse to adapt themselves to the current technology. We understand the difficulties of the older generation who are not tech savvy and hence not in favour of e-paper however it is indeed surprising when young generation also prefer the hard copy and we receive calls from subscribers complaining about not receiving the issue on time. Kindly note that all the issues have been landing in the Postal department on the 16th of every month without fail and the delay caused is due to your local post offices.

Many people are interested in registering online however are unaware of the procedure. Currently all you have to do is draw a cheque in favour of 'Prabhu Tarun' or send cash amount of Rs. 500/- towards the Life time membership of the website to any of the Prabhu Tarun office bearers and then register yourself on www.prabhutarun.org following which your registration will be accepted. The most common query raised by a few is why is the access to the website not free? We at Prabhu Tarun strongly believe that "Anything that comes for FREE has no value." Moreover the maintenance and upgradation of the website involves expenditure. Hence a nominal amount of Rs. 500/- only is charged as the life time registration amount to meet those expenses which I am sure is not a big amount in today's time and age.

I would also like to inform you that we welcome authentic and documented information from all of you if you would like to share with us and publish it on our web-site. However you may kindly note that the entire discretion to publish any matter in form of pictures, documents etc. shall lie with the Prabhu Tarun Editorial team. You may write to us, send valuable information, provide your valuable suggestions or contact us for any information at our pp.prabhutarun@gmail.com and we shall surely consider your views. We sincerely hope to see many new registrations at on web site and we would surely like you all to visit the web site and enjoy the various attractions that we have planned for all of you. Before signing off from here, just wondered if you all agreed to Go Green with us and make a contribution towards saving the Trees and preserving our nature. Hope you did!

**लेखांक-९**

# कालची मुंबई-आजची मुंबई

**— विश्वास नारायण अजिंक्य**

मुंबई बेटावर मालाची वाहतूक जलमार्गे मचवे व गलबतांनी फार पूर्वीपासून होत असे. पण १८३६ पर्यंत मुंबईच्या किनाऱ्यावर माल उतरविण्यासाठी किंवा उतारुंसाठी धक्का नव्हता. इंग्रज राज्यकर्त्यांना मुंबईतून व्यापार करताना बंदरातील संरचनात्मक उणीवांची जाणीव होऊ लागली. व्यापारजितक्या प्रमाणात वाढण्याची गरज होती तितक्या प्रमाणात वाढत नव्हता. त्यासाठी बंदरसुविधांची गरज होती. बंदराकडे येणारे रस्ते मातीचे. माल वाहून आणण्यासाठी बैलगाड्यांचा उपयोग. पावसाळ्यात रस्ते चिखलाने भरले की कामकाज ठप्प होत असे. पृष्ठप्रदेश बंदराशी चांगल्या मार्गांनि जोडण्याची आवश्यकता होती. लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य ऊर्फ 'भाऊ रसूल' यांनी मुंबईत प्रथम बंदरविकासाची संकल्पना राबविली. खाडी बुजविण्यासाठी शहरातला सर्व कचरा टाकून भराव घालण्याच्या कमी खर्चाच्या पद्धतीचा भाऊंनी उपयोग केला आणि कारनॅक आणि क्लेअर बंदरांची उभारणी केली. तेव्हापासून आजतागायत मुंबईत भराव घालताना कचऱ्याचा सर्रास उपयोग केला जातो. ही दोन्ही बंदरे मुंबईतील पहिली विकसित बंदरे. त्यामुळे माल चढविण्या-उतरविण्यासाठी, प्रवाशांसाठी उत्तम व्यवस्था झाली. येथे परदेशी बोटीदेखील लागत असत. भाऊंनी या बंदरांना तत्कालीन गव्हर्नर कारनॅक व क्लेअर यांची नावे दिली पण लोक मात्र त्यांना भाऊंचे धक्के म्हणूनच ओळखत. आरमाराच्या बळावर इंग्रजांनी साम्राज्य उभारले असल्यामुळे अन्य वसाहतीप्रमाणे भारतातही बंदरांचा, गोद्यांचा विकास करण्यास ईस्ट इंडिया कंपनीने, तसेच १८५८ पासून इंग्रज सरकारने अग्रक्रम दिला. मुंबईत पायर बंदर, आर्थर बंदर, कासारा बंदर, मॅलेट बंदर अशी अनेक लहान-मोठी बंदरे एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत कार्यरत होती. चिंचबंदरावर दाणादुणा उतरायचा, तर वाडीबंदरला लाकडाच्या वखारी. कोळसे बंदरात फक्त कोळसाच उतरायचा. आगगाडी, आगबोट, वाफेची यंत्रे फार वाढल्यामुळे कोळश्याचा खूप वापर होऊ लागला व इतर ठिकाणी अडचण होऊ लागली म्हणून फक्त कोळशासाठी कोळसा बंदर अस्तित्वात आले. कालांतराने मुंबईतील सर्व बंदरे पोर्टट्रस्टच्या व्यवस्थापनाखाली आली. सुएझचा कालवा अस्तित्वात आल्यावर युरोपातून मोठमोठ्या बोटी मुंबईस येऊ लागल्या. या बोटी धक्क्यास लागण्यास बंदर नव्हते. म्हणून अल्बर्ट ससून यांनी कुलाब्यातील अतिशय खडकाळ जागा जबर किंमत देऊन खरेदी केली. या जागी १८७२ ते १८७५ अशी तीन वर्षे अतिशय द्रव्य खर्चून बंदर बांधले. हाच ससून डॉक्स. मोठ्ठाल्या आगबोटी जेथे उभ्या राहू शकतील असा खोल पाणी असलेला हा पहिला धक्का. आता ससून डॉक्स कालबाह्य झाल्यामुळे मत्स्य व्यवसायापुरताच तिचा उपयोग मर्यादित राहिला आहे. या अल्बर्ट ससूननीच फील्ड मार्शलच्या पोशाखात घोड्यावर बसलेल्या इंग्लीश राजपुत्राचा (प्रिन्स ऑफ वेल्स, नंतरचे ७वे एडवर्ड) प्रचंड पुतळा घडवून तो सध्याच्या जहांगीर आर्ट गॅलरीसमोरच्या चौकात उभा केला होता. हा काळा घोडा. येथून हलवून तो आता जिजामाता उद्यानात ठेवण्यात आला आहे. या अल्बर्ट ससूनचे वडील डेव्हीड ससून यांनी यांत्रिक प्रगतीचे ज्ञान लोकांना व्हावे यासाठी ससून मेकॅनिक इन्स्टिट्यूट जन्मास घातली.

पांजरपोळाची स्थापना मोतीचंद अमीचंद या धनाढ्य व्यापाऱ्याने १८३४ साली केली. ज्यांना म्हातारी, अशक्त, रोगी अशी गाईगुरे नकोशी झाली असतील त्यांनी ती वाऱ्यावर सोडण्याऐवजी किंवा कसायाला विकण्याऐवजी या जागी आणून सोडावीत. येथे त्यांची दाणा-पाण्याची व्यवस्था लावून ती सुरक्षित ठेवली जातात. मुंबईतील व्यापारीवर्ग मधूनमधून देणगीच्या रूपाने पांजरपोळाच्या कारभाराला मदत करीत असतो. त्यामुळे त्याला पैशांची कधी कमी पडत नाही. १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत तर मुंबईत जंगली जनावरेसुद्धा होती. वाळकेश्वरच्या टेकडीवरील जंगलात तसेच माहीम, कुर्ला येथील जंगलात वाघ, कोल्हे, तरस इत्यादींचे वास्तव्य होते. माणसांची वस्ती वाढली. मग श्वापदांची शिकार वाढली तेव्हा ही जनावरे नाहीशी झाली.

**हसरी रेखा**

**-प्रदीप कोठारे**

**संपर्क - ९८२०९३६४६३**



YUVA MANCH
Together Towards Tomorrow

**Prabhu Tarun Website :** prabhutarun.org

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us, so that we can provide you with your new user IDs.

# GO GREEN!

(Cont. from August Issue)

Non acceptance by every member in the AGM is the most important hindrance. Besides being unaware about the benefits of such systems.

The common points that are to be looked at while installing the system.

The battery bank should have proper ampere hour rating.

Check whether the wind mill is CWET certified.

Is the system MNRE approved and whether subsidy is available on the system.

Whether spare parts are easily available.

Whether anti vibration pads foundation is provided with the system.

How dependable is the after sales service.

Understand the payment schedule.

Facilitative support that government or banks provide to housing societies.

The government gives a Rs.1 lakh per installed kilowatt as subsidy and also depreciation in income tax (if the society pays tax).

The procedure to avail them.

Concerned Company assists in availing these end to end at no extra cost.

Government's role in order to popularize this green initiative.

The government should increase awareness using posters, TV & radios, cinemas. Spread awareness via advertising the subsidy and provide depreciation benefits. Arrange seminars in schools and colleges to propagate these systems. All municipal corporations and government buildings should compulsory install such systems. All high rise buildings above 15 floors must be made to generate their own green power for common facilities, at least.

Recommendations apart from green energy generation.

Use the energy sustainably by using eco-friendly LED lighting fixtures. They utilize only 30 to 40% of the actual power required by their other conventional bulbs. They have an operational life span of nearly 10 to 12 years. They also bring down the replacement cost drastically along with the energy bills.

So Friends lets come together, join hands and save Mother Earth.

**-Narendra Virag Dhairyawan**
9821138102
{avcons_in@yahoo.com}

# Kaun Banega PP Idol?

The afternoon of September 1, 2012 was abuzz with a lot of excitement, exhilaration and anticipation as some of the budding singers from our community put their singing talent to test at the auditions of Pathare Prabhu Idol – A novel show conceptualized by Mrs. Puja Ajinkya of "Valaay Prathishthaan", held at our Pathare Prabhu Khar Cultural Centre. PP Idol as the name suggests clearly top 5 finalists. Out of around 13 talented entries 5 finalists were chosen. These 5 finalists will now compete against each other at the finale!

It was a pleasure to see the friendly judges interact with the participants and also encourage them for having given a special place for music in their lives along with their respective careers. The judgement




indicates a talent hunt show, a format that is very popular on TV but what makes it special is that this show has been organized for the talent of our community exclusively! "Valay Prathishthaan's" PP Idol will be the first talent show of our community in which the participants underwent an initial screening by way of auditions judged by very able names from the music fraternity- Mr. Mangesh Borgavkar and Miss Apurva Gajjala of Saregama Fame!

A very important mention has to be made of the systematic organization of the auditions. Every participant and every attendee had to register first, followed by a quick interview which was video recorded, courtesy Mr. Amar Ajinkya. The hall decorated with posters of PP Idol set the mood just right, and threw a positive energy in the crowd. Each participant patiently waited for their turn in the hall and enjoyed a wonderful cup of coffee and some great conversations with fellow participants and others who had come to extend a moral boost to the organisers as well as the participants. Once the participants' name was announced they had to proceed to an enclosed room, where the judges waited for them. Here, they got their chance to exhibit their singing flair and win the coveted positions of the was clearly unbiased as the organisers also patiently waited to hear the names of the 5 finalists.

Kudos to Mrs. Puja Ajinkya and her team for putting up a great start to what looks like will be a notable entry in the history of our community events! The auditions seem to be just the tip of the iceberg of entertainment! We surely look forward to this extravaganza and wish that the



"Valaay Prathishthaan" team gathers loads of accolades of the whole community for this very honest and ambitious initiative. Now all we need to do is wait and watch these top 5 finalists collide with each other to win the first ever title of PP Idol, 2012. Well well well, do you know who these top 5 finalists are? They might be your uncle, aunt, sister, brother, or rather any other PP socialite you personally know! Be there at sharp 7.00pm on November 24, 2012 at Rangsharda Auditorium, Bandra West, as the "Valaay" team unravels these 5 finalists and presents you the PP Idol! We look forward to seeing you turn up in large numbers and for that kindly book you seats well in advance as the plans open on 19th September. The tickets plan will also be displayed on the group pages of Valaay Prathishthan and Prabhu Tarun on Facebook. Interested people can block their seats and inform Pooja Ajinkya referring to the plan. For further information on the show contact: Pooja Ajinkya on +919820231742.

**-Mayura Nayak**

### Feedback of PP Idol Participants:

**Sushmita Kothare**: "I found the concept interesting. Amateur singers like me got a chance to showcase our hidden talent. Wishing luck to Valaay Pratishthan for this event."

**Dr. Kshiteesh Kirtikar**:" This is a fabulous opportunity for us to showcase our talent before our great community and I appreciate the platform that's been given to us."

**Ronica Vijayakar**: "It was a different experience altogether. Got an opportunity to take part in a singing competition which was organized on such a large scale in our community."

**Tanmay Vijayakar**: "PP Idol is really a cool thing to be introduced in our community, giving opportunities to amateur as well as trained singers of our community to showcase their talent."

**Sanjana Kothare**: " Thanks to Pooja Ajinkya for encouraging my hidden talent which gave me this opportunity to sing in front of professionals and get the awesome experience of a professionally handled programme similar to what we get to see on television."

✳

# SEQUICENTENNIAL CELEBRATION OF BOMBAY HIGH COURT 1862-2012



As part of the celebration, an Exhibition has been organized in the Central Court Room, 2nd floor, High Court Building from 16th August 2012 to 16th September 2012 from 10.00 to 6.00 pm every day including Sundays and holidays.

The Exhibition showcases the history of Law Courts since 13 century in Bombay and displays various Charters establishing the Crown Court in Bombay. Also on display are documents concerning Lokmanya Tilak, John Duncan Inverarity, Mohammed Ali Jinah, Mahatma Gandhi, Sardar Vallabhai Patel, Vithalbhai Patel, K. M. Munshi, Justice M. C. Chagla and Dr. B. R. Ambedkar. Some of the Court artefacts such as the rolls of Advocates and Solicitors, Maces of the Judges, Ceremonial Dress are also placed in the exhibition. The private collection of Solicitor Mr. Rajan Jayakar- Judicial and Non Judicial Stamps and Stamped Papers of British India and Indian Native States is also on view and the photographs of 100 year Old Bombay adds nostalgia. Unique items of Court furniture are also displayed and the recent photographs of High Court Building viewed from the lens of Mr. Kakubhai Kothari are also displayed. The reconstructed Chandeler is also majestically hanging in the Court Room

The Exhibition has already been visited by dignitaries including the Prime Minister and Chief Minister of Maharashtra and is curated by Mr. Rajan Jayakar.

Congratulations Mr. Rajan Jayakar.

# प्रभुतरुण वर्धापनदिन सोहळ्याची छायाचित्रे

छायाचित्रकार: उज्ज्वला गोविंद आगासकर
















## प्रभुतरुणास देणगी

❁ श्री. क्षितीश उदय जयकर यांजकडून त्यांच्या पत्नी 'डिप्लोमा इन अर्ली चाइल्डहूड केअर अँड एज्युकेशन' उत्तीर्ण झाल्याबद्दल रु. १५१/-

❁ २३ जून २०१२ ते २ जुलै, २०१२ दरम्यान आयोजित एन्. सी. सी. शिबीरात कु. अनुष्का आशिष नवलकर हीस एकल नृत्यात प्रथम क्रमांक आणि सुवर्णपदक प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ सौ. ऐश्वर्या आणि श्री. आशिष नवलकरकडून रु. १०१/-

❁ प्रभुतरुण वेबसाईटचे सदस्यत्व:-

श्री. प्रशांत प्रदीप तळपदे रु. ५००/-

श्री. आशिष राव रु. ५००/-

श्री. अमर अजिंक्य रु. ५००/-

श्रीम. दीप्ती नवलकर रु. ५००/-

❁ सुपुत्र श्री. धीरेन याचा कु. मेधा विनायक राणे हिजबरोबर नारळसाखर दिल्याबद्दल श्री. रविकुमार रणजीत यांजकडून रु. १०१/-

❁ कै. आदित्य अतुल नायक यांच्या स्मरणार्थ सौ. पूजा अमर अजिंक्य कडूनरु. ५०१/-

❁ 'वलय प्रतिष्ठान' तर्फे कृतज्ञता म्हणून रु. ५०१/-

❁ श्रीम. विजया रामराव झावबा यांजकडून त्यांची नात करिष्मा किरण श्रीकृष्ण कोठारे ही बी. ई. पदवी परीक्षा प्रथम वर्गात विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण झाल्याबद्दल रु. ५०१/-

❁ सौ. प्रतिमा आणि श्री. विनोद गजानन प्रधान यांजकडून त्यांचा नातू श्री. ऋषिकेष तेज वेलकर एम.एस. ही पदवी अमेरिकेतून पास झाल्याप्रीत्यर्थ रु. २५१/-

**प्रभुतरुणाच्या वर्धापन दिनानिमित्त प्राप्त झालेल्या देणग्या**

❁ सौ. नेत्रा आणि श्री. अजित मोरोबा विजयकर यांजकडून श्रीम. लीला मोरोबा विजयकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने रु. ११,०००/-

❁ सौ. नेत्रा अजित विजयकर यांजकडून मातोश्री सौ. गजान्तलक्ष्मी शंकर वेलकर यांच्या स्मरणार्थ रु.११,०००/-

❁ सौ. संगीता आशिष राव कडून रु.११,०००/-

❁ सौ. उल्का सुरेश विजयकर कडूनरु. ५,०००/-

❁ श्रीम. प्रमिला मधुकर तळपदे यांजकडूनरु. २०००/-

❁ श्री. मिलींद व्यवहारकर कडून रु. २०००/-

❁ श्रीम. माया व्यवहारकरकडून रु. २०००/-

❁ सौ. नीलन् आणि श्री. दीपक माधव धैर्यवान कडून रु. १००१/-

❁ डॉ. सुनील अरविंद राणे यांजकडूनरु. १००१/-

❁ श्री. मिलींद मुकुंद कोठारे यांजकडूनरु. १००१/-

❁ डॉ. पवन कीर्तिकर आणि कुटुंबीयांकडूनरु. ५००/-

❁ श्री. सुधीर धैर्यवानकडूनरु. ५०१/-

❁ श्री. गजानन मोतीराम नवलकर यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुहासिनी गजानन नवलकर कडून रु. ५०१/-

❁ सौ. उर्मिला आणि श्री. उदय बाळाराम जयकर यांजकडून रु. ५०१/-

❁ सौ. आदिती आणि डॉ. अनिकेत तळपदे यांजकडून रु. ५०१/-

❁ सौ. वृंदा शाम जयकर कडून रु. ५०१/-

❁ सौ. सुरेखा प्रदीप कोठारे यांजकडून कै. शरद मोरेश्वर कोठारे (बाबा) यांच्या स्मरणार्थ रु. ५००/-

❁ कु. इशान दीपक कोठारे आणि कुमारी. निष्का दीपक कोठारे या बहीणभावाकडूनरु. ५०१/-

❁ सौ. मनिला आणि श्री. अनिल पूर्णचंद्र राव यांजकडून रु. ५०१/-

❁ सौ. अनुराधा आणि डॉ. विनोद आनंदराव धुंरधर यांजकडून रु. ५०१/-

❁ सौ. सुरुची अनिल प्रधान यांजकडून मातोश्री श्रीमती. उमा सदाशिव धुरंधर यांच्या पंधराव्या स्मृतिदिनानिमित्त रु. ५०१/-

❁ सौ. प्रिया आणि श्री. सुधीर धुरंधर कडून रु. ५००/-

❁ सौ. प्रतिमा आणि श्री. विनोद गजानन प्रधान कडून रु. २५१/-

❁ सौ. सुहास आणि श्री. नंदकुमार विजयकर कडून रु. २५१/-

❁ श्री. मिहीर विनोद धुरंधर यांजकडूनरु. २५१/-

❁ श्री. धीरेन रणजीत कडून रु. १०१/-

## परीक्षेतील सुयश

**डिप्लोमा इन अर्ली चाइल्डहूड केअर अँड एज्युकेशन**

सौ. अमिता क्षितीश जयकर

**दहावी**

कु. शिवानी नंदादीप जयकर ८०.७३%

श्री. सन्मान संजय धुरंधर ६४ %

**बारावी (सायन्स)**

श्री. अभिजित प्रकाश जयकर ७३ %

**बी. ई.**

करिष्मा किरण श्रीकृष्ण कोठारे ७१ % (विशेष गुणवत्तेसह)

**एम. एस. (मेकॅनिकल इंजिनियरिंग, अ‍ॅरिझोना विद्यापीठ- अमेरिका**

श्री. ऋषिकेश (शनाक्त) तेज वेलकर

**एमएमएस इन फायनान्स**

श्री. कौस्तुभ वाचकर गुण ५०१/७००

जागेअभावी 'चिमणीच्या दातांनी' हे सदर या अंकात देऊ शकलो नाही. कल्पना सुभाष कोठारे यांच्या मागील अंकातील सदराचे शीर्षक कृपया **'अगा जे घडलेचि आहे'** असे वाचावे

**-संपादक**

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### नारळसाखर दिला

| | | |
|---|---|---|
| १५-०८-१२ | श्री. जितेन सुरेश नवलकर | कु. मिनोती शेखर चव्हाण (आंतरज्ञातीय) |
| | श्री. धिरेन रवीकुमार रणजीत | कु. मेघा विनायक राणे |
| २६-०८-१२ | कु. कृपाली सुभाष विजयकर | श्री. हेमंत प्रकाश वहाळकर (आंतरज्ञातीय) |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ११-०८-१२ | श्री. तुषार मधुकर तळपदे | वय ६५ | भाई जीवनजी लेन |
| १२-०८-१२ | सौ. आरती प्रवीण धुरंधर | वय ६२ | अंधेरी (पूर्व) |
| १३-०८-१२ | श्रीम. चारुशीला अनंतसेन वैद्य | वय ८४ | भाई जीवनजी लेन |
| २२-०८-१२ | सौ. शुभदा कमलाकांत अजिंक्य | वय ६२ | बोरीवली |
| २३-०८-१२ | सौ. शुभांगी दिलीप अजिंक्य | वय | बोरीवली |
| २६-०८-१२ | श्री. योगेश बालमुकुंद जयकर | वय ६१ | सांताक्रूझ |

## 'श्री कनकाई देवीचा आश्विन नवरात्र उत्सव'

माताजी कनकेश्वरी ट्रस्ट, गीर तर्फे दि. १६ -१०-१२ ते २३-१०-१२ या काळात राजपुरिया बाग, नवीन ठक्कर मार्ग, विलेपार्ले (पू.), मुंबई येथे 'श्री कनकाई देवीचा आश्विन नवरात्र उत्सव' साजरा करण्यात येणार आहे.

देवीची मिरवणूक आणि घटस्थापना दि. १६ ऑक्टोबर रोजी झाल्यानंतर रोज संध्याकाळी आरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वांनी अवश्य लाभ घ्यावा.

भविकांनी श्री.उमेशचंद्र कीर्तिकर ९८६९२२८४८९ आणि श्री. तुषार कीर्तिकर ९८१९४२३१९३ यांच्याशी संपर्क साधावा.

*

**MAHABALESHWAR**

*COME HERE TO EXPERIENCE NATURE AT ITS BEST WITH JASMINE COTTAGE*





THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS . IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST
ALL THE ROOMS HAVE SERENE ENVIRONMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUESTS CAN SIT AND ENJOY THE PLEASANT BEAUTY OF THE NATURE

FACILITIES:

* Attached bath
* Hot & Cold Running water
* Television with Satellite Connection
* Car Parking
* Large open area for playing outdoor games

Location:

It is located near the market in Mahabaleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabaleshwar.

For Booking Contact:
Velkars 9930172689 9220451465